महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, राज्य महाराष्ट्र,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र. १९६७, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र: ०२२-६८५९७४०७
ई -मेल : desk7@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक:- ७/तंशिसं/अनुदान/२०२१/ ४५७ दिनांक 18 NOV 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपुर

विषय : अशासकीय अनुदानित संस्थांना सहाय्यक अनुदान (वेतन)वितरीत करणेबाबत- तपासणीसूची...

संदर्भ: १)शासन निर्णय सीटीई/११७७/१३१६२६ (३३४०)(ix) दि.१८ मे १९७८
२)शासन निर्णय सेवार्थ-२०१५/प्र.क्र.२७८/२०१५/आस्था-१,दि.२१ ऑगस्ट २०१५
३)शासन पत्र क्र.सेवार्थ-२०१६/प्र.क्र.(१६६/२०१५ भाग-१)/तांशि-१,दि.१६ मार्च २०१६

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की,आपल्या विभागाच्या अंर्तगत अशासकीय अनुदानित संस्थांमधील कर्मचा-यांच्या वेतनाकरीता सहाय्यक अनुदान वितरीत करण्याकरीता शासनाने संदर्भ क्र.२ अन्वये एचटीई सेवार्थ संगणकीय प्रणाली अंमलात आणली आहे.त्यानुसार संबंधित संस्थेचे प्राचार्य,संचालक डीडीओ स्तर-१ व संबधित सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय डीडीओ स्तर -२ आहेत.

शासन निर्णय दि.२१ ऑगस्ट २०१५ मधील परिच्छेद ८ नुसार आहरण व संवितरण अधिकारी स्तर -१ यांनी प्रमाणित केलेल्या सर्व पात्र कर्मचा-यांचे लेखाशिर्षनिहाय वेतन देयक एचटीई सेवार्थ प्रणालीव्दारे तयार करावे व संबंधित स्तर -२ चे आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे प्रणालीव्दारे मान्यतेसाठी सादर करावे.प्रत्येक संस्थेने सादर केलेले वेतन देयक स्तर -२ चे आहरण व संवितरण अधिकारी माहीती तपासून ती योग्य असल्याची खात्री केल्यानंतरच मंजुर करतील व मंजुर केलेले वेतन देयक एकत्रितरित्या महाराष्ट्र कोषागार नियम नियम नमूना क्र.४४ मध्ये कोषागारात सादर करतील असे सुस्पष्ट निर्देश आहेत.

शासन निर्देशाप्रमाणे वेतन देयके तयार करणे संस्थेचे प्राचार्य/संचालक यांची जबाबदारी आहे, तसेच अनुदानित संस्थांना वेतन व भत्ते याकरीता सहाय्यक अनुदान वितरणाची जबाबदारी सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाची आहे.

यासंदर्भात पुढे असे कळविण्यात येते की, संस्थेने सादर केलेल्या वेतन देयकात समाविष्ट असलेल्या वेतन व भत्ते संदर्भात सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय स्तरावर खालीलप्रमाणे नमूद बाबींची अचूकरित्या तपासणी करण्यात यावी.

(१) <u>मुळ वेतन</u> - संस्थांच्या वेतन देयकातील प्रत्येक कर्मचा-यांचे मुळ वेतन संचालक तंत्रशिक्षण /सहसंचालक विभागीय कार्यालय यांनी वेतननिश्चिती प्रमाणे मान्य केलेल्या मुळ वेतनाची रक्कम अचूक असल्याची खात्री करावी.

(२) <u>महागाई भत्ता</u> - शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार अनुज्ञेय दरानेच रक्कम देयकात आकारण्यात आली आहे काय ते तपासावे.

(३) <u>महागाई भत्ता थकबाकी</u> - थकबाकी मागणी केली असल्यास थकबाकीचे देयकासोबत संस्थेने विवरणपत्र जोडले आहे काय ते तपासून अचूक असल्याची खात्री करावी.

(४) <u>घरभाडे भत्ता</u> - घरभाडे भत्ता शहराच्या वर्गीकरणानुसार अचुक देयकात आकारण्यात आला आहे काय ते तपासावे संस्थेचे मुख्यालयाचे ठिकाण विचारात घेवूनच घरभाडे भत्ता मंजुर करावा.कर्मचा-यांचे वास्तव्याचे ठिकाण विचारात घेवू नये.

(५)<u>वाहतूक भत्ता</u> - शासन निर्णयानुसार ज्याचे निवासस्थान १ किलोमीटरच्या आत आहे,अशा कर्मचा-यांना अनुज्ञेय नाही. तरी त्यांचे निवासस्थानाबाबत संस्थांप्रमुखांचे प्रमाणपत्र घ्यावे व वाहतूक भत्ता देय असल्याचे संस्थांप्रमुखांकडून प्रमाणित करून घ्यावे.

(६) **स्थानिक पुरक भत्ता** - संस्थेने मुख्यालयाचे ठिकाण विचारात घेवूनच शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या वर्गीकरणानुसार स्थानिक पुरक भत्ता मंजुर करण्यात यावा.

(७) <u>रजा प्रवास सवलत</u> - रजा प्रवास सवलतीचे देयक मंजुर करताना प्रत्यक्ष प्रवास केला आहे यासाठी त्या ठिकाणची तिकीटे जोडली आहेत याची खात्री करण्यात यावी.

(८) <u>वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती</u> - वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्तीचे संचालनालयाचे मंजुरी आदेश व रूग्णालयाचे संपुर्ण खर्चाची देयके इत्यादी बाबी तपासणी करावी.

(९) <u>रजा रोखीकरण</u> - कर्मचा-यांचे रजारोखीकरण अदा करताना सेवानिवृत दिनांकाच्या वेळी असलेले मुळ वेतन अचुक असल्याची खात्री करून परिगणना करावी.तसेच रजारोखीकरणा बाबतचे संचालक/सहसंचालक यांचे मंजुरी आदेश प्राप्त करून घ्यावे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक देयके तपासणी करूनच संस्थांना देय अनुदान दरानुसारच अनुदान देयक कोषागारात पारीत करण्याकरीता सादर करावे.

आपल्या अधिनस्त अशासकीय संस्थांना अनुदानाच्या संदर्भातील वेतन व भत्ते देयके अचुक तयार करून सादर करण्याबाबत आपल्या स्तरावर निर्देश देण्यात यावे. आहरण केलेला निधी ज्या प्रयोजनाकरीता वितरीत करण्यात आलेला आहे त्याच प्रयोजनाकरीता उपयोगात / खर्ची घातलेला आहे याबाबतची खात्री करावी. कोणत्याही प्रकारे अनुदान अतिप्रदान होणार नाही याची दक्षता घ्यावी. अनुदान अतिप्रदान वितरीत झाल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी व्यक्तीशः संबंधित सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई